# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः18.02.2025 वारःमंगळवार

---

- देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती
- कतारचे अमिर दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर; भारत-कतार दरम्यान द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा होणार
- एमएसएमईसाठी विनातारण पत हमी योजनेची केंद्रीय अर्थमंत्र्यांची घोषणा
- रशिया आणि युक्रेनदरम्यान युद्धबंदीसाठी आज रियाध इथं बैठक

आणि

- खेलो इंडिया हिवाळी क्रिडा स्पर्धा लांबणीवर

**<u>निवडणूक</u>**

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून निवड झाली आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा कार्यकाळ आज संपत आहे. ज्ञानेश कुमार १९८८च्या केरळ तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. यापूर्वी संसदीय कार्य मंत्रालयातील सचिव म्हणून ते कार्यरत होते. डॉ विवेक जोशी यांची नवे निवडणूक आयुक्त म्हणून निवड करण्यात आली आहे. ते १९८९ सालच्या हरियाणा तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी या दोघांच्याही नावावर शिक्कामोर्तब केलं आहे.

**<u>कतार</u>**

कतारचे अमिर शेख तमिम बिन हमाद अल थानी यांचं काल भारताच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी दिल्लीत आगमन झालं.
आज राष्ट्रपती भवन इथं त्यांच्यासाठी स्वागत समारंभाचं आयोजन करण्यात आलं आहे. भारत कतार दरम्यान विविध द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा करण्यासाठी आज बैठक होणार आहे.

**<u>निर्मला</u>**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग अर्थात एमएसएमईसाठी विनातारण पत हमी योजनेची घोषणा केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारमण यांनी काल मुंबईत केली. या योजनेमुळे एमएसएमईना तारण न घेता यंत्रसामग्री किंवा उपकरणे खरेदी करण्यासाठी १०० कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध होईल. गेल्या तीन अर्थसंकल्पांमध्ये एमएसएमई सुधारण्यावर लक्ष केंद्रित करून अनेक पावले उचलण्यात आली आहेत. देशाच्या भांडवली बाजारातील गुंतवणूक चांगला परतावा देणारी ठरत आहे. असंही त्या म्हणाल्या. संरक्षण उत्पादन क्षेत्राला पाठिंबा देण्यासाठी केंद्र सरकारनं अनुकूल धोरण राबवली आहेत. यामुळे भारताची संरक्षण निर्यात २४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे आणि महाराष्ट्र संरक्षण उत्पादनाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. असंही त्या यावेळी पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या

**<u>आयात</u>**

२०२४-२५ या आर्थिक वर्षात त्या आधीच्या वर्षीच्या तुलनेत भारताच्या निर्यातीत ७ पुर्णांक २१ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे, तर आयातीत एप्रिल ते जानेवारी या कालावधीत ८ पुर्णांक ९६ टक्के वाढ नोंदवली गेली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने काल जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या कालावधीत एकंदर निर्यात सुमारे ६८३ अब्ज अमेरिकन डॉलर्स झाली आहे तर आयात एकंदर ७७० अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे.

सध्याच्या आर्थिक वर्षात एप्रिल ते जानेवारी दरम्यान व्यापारी मालाची निर्यात ३५९ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती तर याच कालावधीत आयात एकंदर ६०२ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती.

या कालावधीत व्यापारी मालाची तूट सुमारे २४३ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी होती. अशी माहिती मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीत देण्यात आली आहे.

**<u>अमित-शहा</u>**

देशात जुलैमध्ये लागू झालेल्या तीन नवीन फौजदारी कायद्याच्या जम्मू आणि काश्मीरमधील अंमलबजावणीबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज आढावा बैठक घेणार आहेत. यावेळी जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह केंद्रीय गृहमंत्रालय आणि राज्याच्या गृहमंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, गुप्तचर विभागातील अधिकारी,तसच वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित राहणार आहेत. पोलिस, न्यायालय, तुरुंग, न्यायवैद्यक

प्रयोगशाळा आणि खटल्याबाबत मार्गदर्शन असणाऱ्या भारतीय न्यायसंहिता 2023, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 आणि भारतीय साक्ष अधिनियम 2023 या नव्या तीन कायद्यातल्या तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात यावेळी चर्चा करण्यात येणार आहे.

**प्रधानमंत्री**

१५ व्या वित्त आयोगाच्या कालावधीत एकात्मिक प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान अर्थात पीएम-आशा योजना २०२५-२६ आर्थिक वर्षापर्यंत सुरू ठेवण्यास केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. या निर्णयासह, सरकारनं २०२४-२५ या खरेदी वर्षासाठी राज्याच्या उत्पादनाच्या १०० टक्के समतुल्य किंमत समर्थन योजनेअंतर्गत तूर, उडीद आणि मसूर डाळींच्या खरेदीलाही परवानगी दिली आहे. यामुळे डाळींचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यात आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यात शेतकऱ्यांचं योगदान वाढण्यास मदत होणार आहे.

२०२४-२५ च्या खरीप हंगामासाठी किंमत आधार योजनेअंतर्गत आंध्र प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये तूर डाळीची खरेदी करण्यास केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मान्यता दिली आहे. याअंतर्गत एकंदर १३ लाख मेट्रिक टन खरेदी होईल. आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये खरेदी आधीच सुरू झाली आहे आणि या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत या राज्यांमध्ये एकूण १५ हजार मेट्रिक टन तूर डाळीची खरेदी करण्यात आली आहे, ज्यामुळे १२ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. अशी माहिती कृषी मंत्रालयानं दिली आहे.

**रशिया आणि युक्रेन**

रशिया आणि युक्रेनदरम्यान युद्ध बंदीसाठी आणि दोनही देशांचे संबंध सुधारण्यासाठी वाटाघाटी घडवून आणण्याच्या उद्देशानं दोन्ही देशांच्या वरिष्ठ नेत्यांसह, वरिष्ठ अमेरिकी आणि रशियाचे अधिकारी आज सौदी अरेबियात चर्चा करणार आहेत. तीन वर्षांपूर्वी युक्रेनमध्ये रशियानं केलेल्या लष्करी कारवाईनंतर ही दोन्ही पक्षांमधील सर्वात महत्त्वाची बैठक असेल. अशी माहिती रशियाच्या अध्यक्षांच्या कार्यालयाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी दिली आहे. रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह आणि परराष्ट्र व्यवहार सल्लागार युरी उशाकोव्ह सौदीची राजधानी रियाधला इथं या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, अमेरिका-रशिया चर्चेत युक्रेन भाग घेणार नाही असं युक्रनचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर झेलेन्स्की यांनी सांगितलं.

**परीक्षा पे चर्चा**

परीक्षा पे चर्चा 2025 चा नवीन भाग आज प्रसारित करण्यात येणार आहे. यामध्ये विविध परीक्षा मंडळांच्या परीक्षेत प्रथम आलेले यशस्वी विद्यार्थी आपले अनुभव सांगणार आहेत. तसच परीक्षा काळात चिंता , तणाव यांचा यशस्वीपणे सामना कसा करावा याबाबत आपले अनुभव हे यशस्वी विद्यार्थी यामध्ये सांगणार आहेत . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल समाजमाध्यमावर याबद्दलची एक ध्वनिचित्रफित प्रसारित केली.

**नक्शाभूसर्वेक्ष**

राष्ट्रीय नागरी भूस्थानिक आधारित जमीन सर्वेक्षण अर्थात नक्शा या उपक्रमाचं उद्घाटन आज ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते होणार आहे. याअंतर्गत २६ राज्यांमधल्या नागरी भागात भूसर्वेक्षण केलं जाणार आहे. शहरी भागात जमिनीच्या मालकीचे अचूक आणि विश्वासार्ह तपशील तयार व्हावेत यासाठी जमिन नोंदणी करणं आणि माहिती अद्ययावत करण्याचं काम केलं जाईल. माहिती तंत्रज्ञानावर आधारित या यंत्रणेमुळे पारदर्शकता, कार्यक्षमता वाढेल आणि शाश्वत विकासालाही त्याचा हातभार लागेल असं ग्रामविकास मंत्रालयानं नमूद केलं आहे. महाराष्ट्रातल्या १० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे सर्वेक्षण होणार असून त्यात बुलडाणा नगर परिषद क्षेत्राचा समावेश आहे.

**रेल्वे**

गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी भारतीय रेल्वे प्रशासन देशभरातील ६० रेल्वे स्थानकांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहेत. गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी रेल्वे प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करेल. प्रवाशांच्या सुविधा आणि सुरळीत वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी सर्व दिल्ली रेल्वे स्थानकांवर एक विशेष मोहीम सुरू केली जाईल. अशी माहिती उत्तर रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी हिमांशू शेखर उपाध्याय माध्यमांशी बोलताना दिली.

**महिला क्रिकेट**

गुजरात मधल्या बडोदा इथ काल झालेल्या महिला क्रिकेट प्रीमियर लीग च्या सामन्यामध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगरुळू संघाने दिल्ली कॅपिटल संघाचा 8 खेळाडू राखून पराभव केला. दिल्ली कॅपिटल संघाने ठेवलेल 141 धावांच लक्ष्य रॉयल चॅलेंजर्स बेंगरुळू संघाने केवळ 2 खेळाडूंच्या मोबदल्यात 16 षटके आणि 2 चेंडूत १४६ धावा करून पूर्ण केल. रॉयल चॅलेंजर्स बेंगरुळू संघाची कर्णधार स्मृति मांधाना हिने ४७ चेंडूत ८१ धावा करत हा शानदार विजय साकार करण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली.

**खेलो इंडिया**

यावर्षीच्या खेलो इंडिया हिवाळी क्रिडा स्पर्धेचा दुसरा आणि अखेरचा टप्पा पुरेशी बर्फवृष्टी न झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आला आहे. स्पर्धांसाठी हवामान अनुकूल झाल्यानंतर सुधारित वेळापत्रक जाहीर केले जाईल. असं क्रिडामंत्रालयानं कळवण्यात आलं आहे. गेल्या महिन्याच्या २३ ते २७ तारखेपर्यंत लडाखमध्ये एनडीएस स्पोर्ट्स मैदान आणि गुफुक तलाव इथं आइस हॉकी आणि आइस स्केटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यावर्षी विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि इतर संघटनांचे प्रतिनिधित्व करणारे १९ संघ सहा क्रिडा प्रकारांमध्ये सहभागी झाले आहेत. पहिल्या टप्प्यात लडाख सध्या चार सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्यपदकांसह पदक तालिकेत आघाडीवर आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.